CMYK

केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते 'राजमाता महोत्सव'चा शुभारंभ >>पान 2

जिल्ह्यात २४ हजार लाडक्या बहिणी अपात्र >>पान 3

बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकाच्या मंजूर झालेल्या नविन शाखा ३१ मार्चपर्यंत सुरु करा >>पान 4

सुविचार

भक्तीचा प्रकाश जीवनात आनंद आणि समृद्धी देतो

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




भावा SSS! विकी कौशलसाठी सूर्याची मराठी स्टाईलने कमेंट, अभिनेत्यानेही दिले भन्नाट उत्तर

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 199 ■ शनिवार, दि. 01 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेसाठी फिनटेक, 'एआय' स्टार्टअपला गती : मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

मुंबई/प्रतिनिधी : फिनटेक आणि 'एआय' क्षेत्रातील स्टार्टअप्सला गती देण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करत असून देशात महाराष्ट्र राज्य स्टार्टअप आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर आहे. जेव्हा आपण ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो, तेव्हा तंत्रज्ञान हा विकासाचा मुख्य आधारस्तंभ असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. बीकेसी येथे मुंबई टेक वीक २०२५ चा शुभारंभ झाला. उद्घाटनप्रसंगी लोकमत समुहाचे सहव्यवस्थापकीय संचालक ऋषी दर्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जियो कन्वेंशन सेंटर येथे मुलाखत घेतली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा भविष्यातील रोडमॅप आणि राज्य सरकारच्या तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली.


## मुंबई टेक वीक २०२५ चे उद्घाटन; व्हॉट्सॲप चॅटबॉट आणि नॉलेज 'एआय' हब संदर्भात सामंजस्य करार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत एम.एम.आर.डी.ए. आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (छझउख) यांच्यात सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. एम.एम.आर.डी.ए.ने एन.पी.सी.आय.ला मुंबईतील बीकेसी येथे त्यांच्या जागतिक मुख्यालयाच्या उभारणीसाठी भूखंड प्रदान केला. आपले सरकार व्हॉट्सअँप चॅटबॉट संदर्भात माहिती तंत्रज्ञान विभाग आणि मेटा यांच्यामध्ये तसेच कौशल, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि ढए-च् सोबत नॉलेज -ख हब संदर्भात सामंजस्य करार झाला. त्याचबरोबर उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजक संग्रहालयाची स्थापना केली जाणार असल्याची घोषणा >>पान २




## सोशल मीडियावर दिल्या जाणाऱ्या धमक्या सरकारने गांभीर्याने घ्यायला हव्या; इंद्रजित सावंत यांचं मत

दैनिक आपला विदर्भ



कोल्हापूर /प्रतिनिधी : इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना अगदी २ दिवसांपूर्वीच नागपुरातील व्यक्तीने धमकीचा फोन केला होता. याप्रकरणी कोल्हापूर आणि नागपूर पोलीस तपास करत आहेत. मात्र, त्यातच आता इंद्रजित सावंत यांना सोशल मीडियावर धमकीच्या कमेंट येत आहेत. युट्यूब वरील व्हिडीओखाली धमकीची कॉमेंट करण्यात आलीय. त्यामुळे इंद्रजित सावंत यांनी पोलिसांनी सुमोटो संबंधित व्यक्तीवर कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिका व्यक्त केली आहे. सोशल मीडियावर अशा पद्धतीने दिल्या जाणाऱ्या धमक्या सरकारने गांभीर्याने घ्यायला हव्या, असं मत इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी व्यक्त केले.



## दत्तात्रय गाडेला फासावर लटकावण्यासाठी पाठपुरावा करणार, रुपाली चाकणकरांनी दिले संकेत

दैनिक आपला विदर्भ

पुणे/प्रतिनिधी : स्वारगेट बस डेपोतील शिवशाही बसमध्ये कोंडून तरुणीवर बलात्कार केल्याचा आरोप असलेल्या दत्तात्रय गाडे याला पोलिसांनी शिरुरमधून अटक केली. या प्रकरणात आरोपीला फाशी व्हावी यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर म्हणाल्या. >>पान २

## आरोपी दत्तात्रय गाडेला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी

### दोघांच्या संमतीने शारीरिक संबंध झाल्याचा आरोपीच्या वकिलाचा दावा

पुणे/प्रतिनिधी : स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याला १४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकावर २६ वर्षीय महिलेवर बलात्कार झाल्याची घटना घडली होती याप्रकरणी काल मध्य रात्री आरोपी दत्तात्रय गाडेला अटक करण्यात आली असून त्याला पुणेशिवाजीनगर कोर्टात हजर करण्यात आले आहे.दरम्यान हा




गुन्हा एवढा गंभीर नसून बस मध्ये दोघांमध्ये संमतीने शारीरिक संबंध असल्याचा दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे.तसेच तरुणीने कोणताही प्रतिकार केला नाही, तरुणी स्वतःहुन बसमध्ये चढली, असाही दावा आरोपीच्या वकिलाने केला आहे.त्यामुळे आरोपीला दोन दिवसाचीच पोलीस कोठड्याची देण्याची मागणी आरोपीच्या वकिलांनी केली होती तर सरकारी वकिलांनी आरोपीवरील गुन्ह्यांची माहिती कोर्टात दिली



आहे. हा गुन्हा अत्यंत तीव्र स्वरूपाचा असल्याचं सरकारी वकिलांनी म्हटल आहे

दरम्यान आरोपीने पिडीतेवर दोनवेळा बलात्कार केला तसेच तिला आपण बसचा वाहक असल्याचे सांगीतले होते, अशी माहिती पोलिसांनी कोर्टात दिली असून अधिक चौकशीसाठी तसेच आरोपी बरोबर आणखी काही जण होते का त्याला आणखी कोणी मदत केली का हे तपासण्यासाठी १४ दिवसांची पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली होती मात्र न्यायालयाकडून बारा दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## शिवसेना 'विरोधी पक्षनेता' पदासाठी दावा करेल अंबादास दानवे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ



मुंबई /प्रतिनिधी : अधिवेशन ३ तारखेला सुरु होतंय त्याची पूर्व तयारी चालू झाली आहे. बीड प्रकरणा, पुण्याचे प्रकरण, मुंबईतील जागा अदानीला देण्याचा, शेतकऱ्यांचे विषय या सर्व विषयाला घेऊन जनतेच्या हिताच्या भूमिका मांडण्याच्या दिशेने तयारी सुरू केली आहे. येणाऱ्या अधिवेशनात दोन्ही सभागृहातील आमदार या सरकारवर तुटून पडणार आहेत. नक्कीच शिवसेना विरोधी पक्षनेता पदाला दावा करेल. समर्थनाचा प्रश्र्न नाही शेवटी भूमिका अध्यक्षाची घ्यायची असते, पक्ष प्रमुख निर्णय घेतील.

सरकारची, विधानसभा अध्यक्षांची भूमिका काय, सरकारची मानसिकता काय हे समजून गरज आहे. ते समजून शिवसेना पक्ष निर्णय घेईल.अशी माहिती विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## अलिबागच्या समुद्रात मच्छीमारांच्या बोटीला आग

अलिबाग/प्रतिनिधी : अलिबागच्या समुद्रात मच्छीमारांच्या बोटीला आग लागली आहे. ही दुर्घटना आज (शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५) सकाळी दहाच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार साखर गावातील राकेश मारुती गण यांच्या मासेमारीच्या बोटीला आग लागली.

बोटीत २० जण होते. त्यांची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. आग लागल्यामुळे बोट ८० टक्के जळून खाक झाली. बोटीच्या वरील जाळी देखील जळाली आहे. आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. शॉर्ट सर्किटने आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

# खवल्या मांजरची तस्करी करणाऱ्या आरोपींना अटक

दैनिक आपला विदर्भ

वर्धा/प्रतिनिधी : दिनांक २७ फरवरी रोजी वर्धा वनपरिक्षेत्रातील मौजा पुलगांव येथे खवल्या मांजरची तस्करी होत असल्याबाबतची गुप्त माहिती वाईल्ड लाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो, मुंबई व अमरावती यांच्याकडून प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने वाईल्ड लाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो मुंबई व अमरावती तसेच वनपरिक्षेत्र, वर्धा यांच्या तीन टिम बनून





सापळा रचून सदर तस्करीची योजना हाणून पाडली गेली. या कार्यवाही दरम्यान एक जिवंत खवल्यामांजर सह ६ आरोपींना अटक करुन १ स्वीप्ट गाडी जप्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणात पुढील तपास सुरु असून, आणखी आरोपी वाढण्याची दाट शक्यता असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर यांनी दिली.

## वाल्मीक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असेल तर यावर प्रशासनाने कारवाई केली पाहिजे, ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांची प्रतिक्रिया

जालना /प्रतिनिधी : वाल्मीक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट आहे की नाही माहिती नाही. जर वाल्मीक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असेल तर यावर प्रशासनाने कारवाई केली पाहिजे अशी मागणी ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी आज दिनांक २८ शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता मेरीट हॉटेल येथे माध्यमांशी बोलताना केलीय. पुणे येथील स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपीला भरचौकात फाशी झाली पाहिजे असं वाघमारे म्हणालेत.

जालन्यात आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांच्या प्रश्र्नांना उत्तर देताना ते बोलत होते. योगेश कदमांच्या घरी माता - भगिनी नसतील अशी प्रतिक्रिया वाघमारे यांची कदम यांच्या स्वारगेट अत्याचार प्रकरणातील वादग्रस्त वक्तव्यावर दिलीय. गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी केलेलं वक्तव्य चुकीचं आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी कदम यांचे कान टोचावे असं देखील वाघमारे यांनी म्हटलंय. आरोपी कृष्णा आंधळे हयात आहे की नाही हे पोलिसांनी शोधावं, जर कृष्णा आंधळे हयात असता तर आता पर्यंत सापडला असता असं म्हणत फरार असलेला आरोपी कृष्णा आंधळे सापडत नाही हे गृहविभागाच अपयश असल्याचं वाघमारे म्हणालेत.

# लाच घेताना सरकारी वकीलास रंगेहात अटक; मेहकर येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/प्रतिनिधी : डोणगाव पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यात आरोपीला शिक्षा होईल, अशी बाजू मांडण्यासाठी सरकारी वकील जनार्दन बोदडे यांना तब्बल १ लाख रुपयाची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली. ही कारवाई वाशीम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने २८ फेब्रुवारी रोजी मेहकर येथील न्यायालयाच्या परिसरात करण्यात आली. घटनेबाबत प्राप्त माहिती नुसार ५० वर्षीय इसमाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली की, डोणगाव पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्याच्या कोर्ट केसमध्ये आरोपीला शिक्षा होईल, अशी बाजू कोर्टात मांडण्यासाठी मेहकर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व सहाय्यक सरकारी वकील जनार्धन मनोहर बोदडे वय- ६१यांनी ३ लाख रुपयांची मागणी केली. अशी तक्रार २४ फेब्रुवारी २०२५ रोजी दिली. तक्रार पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तडजोड अंती २ लाख ५० हजार रुपयांची पंचासमक्ष मागणी केली व सापळा कारवाई दरम्यान २८ फेब्रुवारी रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय मेहकर येथे पंचासमक्ष लाचेचा पहिला हप्ता १ लाख रुपये स्वीकारताना आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध मेहकर पोलीस स्टेशन येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कारवाई लाचलोचपत प्रतिबंधक विभागाचे अमरावती विभागाचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात सापळा व तपास अधिकारी वाशिम लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक तथा प्रभारी पोलीस उपाधीक्षक बालाजी तिप्पलवाड, पोहवा.विनोद मार्कंडे, पोहवा.आसिफ शेख, पोहवा.योगेश खोटे, नापोशि.रविद्र घरत व चालक पोहवा. मिलिंद चन्नकेशला यांच्या पथकाने केली.

### लाचेची मागणी केल्यास तक्रार करा

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग वाशीम दुरध्वनी क्रं - ०७२५२ २३५९३३ टोल फ्रि क्रं १०६४ वर संपर्क करण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



CMYK

## महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस स्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला. स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. या घृणास्पद घटनेने केवळ पुण्याचीच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. पुण्यात घडलेली ही महिला अत्याचाराची घृणास्पद घटना ही काय राज्यातील पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी हमखास वाचायला मिळते. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील निर्भयावर झालेल्या अत्याचाराने तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता.बदलापुरात चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतच झालेल्या अत्याचाराने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. बदलापुरची घटना तर मानवतेला काळीमा फासणारी होती. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली सर्वत्र संतापाची लाट उसळते. मोर्चे निघतात. निषेध व्यक्त होतो. इलेक्ट्रॉनिक मिडियात चर्चा होते. प्रिंट मीडियात अग्रलेख लिहिले जातात. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडतात. शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचे आश्र्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडुन शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रालाशरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

# केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते 'राजमाता महोत्सव'चा शुभारंभ

## बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्नशिल – ना.प्रतापराव जाधव





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राजमाता महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना कर्तृत्व व कौशल्य दाखविण्यासाठी उत्तम व्यासपीठ मिळाले असून त्यांचा महिलांनी लाभ घ्यावा. तसेच बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी आज येथे दिली.

ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे जिजामाता प्रेक्षागार क्रीडा व व्यापारी संकुल येथे राजमाता विभागस्तरीय सरस तथा बुलढाणा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनीचा शुभारंभ केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अतिरिक्त मख्य कार्यकारी अधिकारी बि.एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, आशिष पवार, विक्रांत जाधव, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रकल्प संचालक राजेश इंगळे, मुख्य लेखाधिकारी प्रकाश राठोड आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, केंद्र व राज्य शासन विविध योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी काम करीत आहे. जोपर्यंत महिला स्वावलंबी होणार नाही तोपर्यंत देशाचा संपूर्ण विकास होणे शक्य नाही. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली तरच तिची समाजात स्वतंत्र ओळख निर्माण होते. त्यामुळे महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून खाद्यपदार्थ, सजावटी वस्तू, साहित्य निर्मिती, खेळणे अशा विविध उत्पादनाची निर्मिती करावी. उत्पादीत केलेले वस्तू, पदार्थांची विक्री स्थानिक ठिकाणी, तालुका व शहरी भागात विक्री करावी. केवळ वस्तू उत्पादनावर भर न देता वस्तूची पॅकींग, मार्केटिंग व



ब्रॅडींगवर भर द्यावा. यासाठी घरोघरी जाऊन आपल्या मालाची माहिती ग्राहकापर्यंत पोहोचवावी, असेही ते यावेळी म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्यासाठी ६३ हजार घरकुल मंजूर झाले असून यामुळे जिल्हयातील पात्र गरजू लाभार्थींचे घराचे स्वप्न पूर्ण होणार असून कोणीही घरापासून वंचित राहणार नाही. तसेच बचत गटासाठी शासन अल्पदरात कर्ज उपलब्ध करुन देत आहे. तसेच बचत गटांचा समूह तयार करुन मोठे उद्योग निर्मितीसाठी केंद्र शासनामार्फत ५० लाखापर्यंत कर्ज पुरवठा बचत गटांना दिल्या जात आहे. याचा लाभ महिलांनी घ्यावा, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, राजमाता महोत्सव विक्री व प्रदर्शनी महिला बचत गटासाठी पर्वनी असून उत्पादीत केलेल्या वस्तू व पदार्थ ग्राहकापर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. बचत गटांना सक्षम करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिल्या जात आहे. महिलांनी खाद्य पदार्थ निर्मिती करण्यापर्यंत सिमींत न राहता लोकांच्या आवडीनुसार वस्तू तयार कराव्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी राजमाता महोत्सव प्रदर्शनीतील विविध स्टॉल्सला भेटी देऊन स्टॉलधारक महिलाभगिनींशी संवाद साधला. येथे गृहपयोगी वस्तू, मिलेट्स उत्पादने, बांबूच्या वस्तू, धान्य, विविध शासकीय दालने, विविध खाद्यपदार्थ आदी स्टॉल्स लावण्यात आले असून हा महोत्सव दि. ४ मार्चपर्यंत सुरु राहणार आहेत. ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी प्रास्ताविक केले. चारुशिला माळोदे व गजानन कंकाळे यांनी संचालन तर आभार आशिष पवार यांनी मानले.

राजमाता महोत्सवात बचत गटांची उत्पादने, खाद्यपदार्थ, वस्तू यांची १५० हून अधिक दालने असून, रोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे. या भव्य प्रदर्शनी व विक्री महोत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## खुद्दार पुन्हा निवडून आले त्यांना आता गद्दार म्हणण्याचा अधिकार नाही गुलाबराव पाटील : विरोधकांना चिमटा

**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :**उद्धव ठाकरे हे मनात होते की, आमच्या भरोशावर निवडून येतात. मात्र, आता हे खुद्दार पुन्हा निवडून आले. त्यामुळे त्यांना आता कोणालाही गद्दार म्हणण्याची अधिकार नाही, असा राजकीय चिमटा मंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांना घेतला.



माध्यमांशी बोलताना मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, पोलिसांनी आरोपीला अटक केली असली तरी, योग्य तपास करून त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. अशा नराधमांना कठोर शिक्षा झाल्याशिवाय अशा गोष्टींना देखील आळा बसणार नाही. मला खात्री आहे. आरोपीला कठोर शिक्षा होईल, यासाठी पोलीस काळजी घेतील. बसमध्ये सापडलेले कंडोमची पाकीट, साडी याचा तपास पोलीस करतीलच पण अशी घटना बसमध्ये होते, ही अत्यंत निंदनीय बाब आहे. जळगाव बस स्थानकात देखील दारूच्या बाटल्या आणि कंडोमची पाकिटे सापडली होती, याबाबत गुलाबराव पाटील यांना विचारले असता आजच पोलीस अधीक्षक तसेच एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाई करण्याच्या सूचना देणार आहे, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले. तसेच गद्दर कोण राहिले आता, दिसून आले आहे. उद्धव ठाकरे म्हणत होते. की आमच्या भरोशावर निवडून येतात. पण हे खुद्दार आता पुन्हा निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना आता कुणालाही गद्दार म्हणण्याचा अधिकार नाही.असा चिमटा मंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांना घेतला.

## भावा SSS! विकी कौशलसाठी सूर्याची मराठी स्टाईलने कमेंट, अभिनेत्यानेही दिले भन्नाट उत्तर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता विकी कौशलचा 'छावा' हा सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. पंजाबी असूनही विकीने या चित्रपटातून मराठी माणसाचे मन जिंकले आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या सिनेमानंतर विकीच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. विकीने २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात त्याने कुसुमाग्रजांची प्रसिद्ध कविता 'कणा' सादर केली. विकीचे मराठी, त्याचा उच्चार आणि मराठी भाषेबद्दलचे प्रेम पाहून प्रेक्षक भारावून गेले. विकीची क्रेझ तर वाढत चालली आहे. सेलिब्रेटी देखील विकीचं कौतुक केल्याशिवाय पुढे जात नाहीत. केवळ चाहतेच नाही तर अनेक कलाकार आणि सेलिब्रिटीही विकीच्या या भूमिकेचे कौतुक करत आहेत. अलिकडेच भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवने 'छावा' पाहिला आणि विकीसाठी खास पोस्ट शेअर केली. सूर्यकुमारने थेट मराठीत त्याची प्रतिक्रिया दिली.

सूर्याने सिनेमातील एका दृश्याचा फोटो शेअर केला ज्यात छत्रपती संभाजी महाराज सिंहाला मारत आहेत तो सीन आहे. या फोटोला कॅप्शन देताना सूर्याने मराठीत लिहिले, भावा प्रॉपर छावा. यासोबतच त्याने फायर, हार्ट आणि नजरेचे इमोजीही पोस्ट केलेत. विकीनेही सूर्याची ही पोस्ट रीपोस्ट करत **SSSS**! असा रिप्लाय दिला.

'छावा'ने प्रदर्शित झाल्यापासून १४ दिवसांत जगभरात ५५५.३ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. तर भारतात या चित्रपटाने ४८४.३ कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे. १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेला हा चित्रपट दुसऱ्या आठवड्यातही प्रेक्षकांची पसंती मिळवत आहे. आता तिसऱ्या आठवड्यात 'छावा'ची कमाई किती होते हे पाहणे महत्त्वाचे असेल.

पान १ वरून...

## ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेसाठी फिनटेक, 'एआय' स्टार्टअपला गती : मुख्यमंत्री

यावेळी करण्यात आली.

मुलाखतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वॉररूममुळे प्रकल्पांच्या निर्णय प्रक्रियेला वेग मिळला आहे. पूर्वी मुंबईत एखादा प्रकल्प सुरू करण्यासाठी १८ विविध सरकारी यंत्रणांची परवानगी घ्यावी लागायची, त्यामुळे प्रकल्पांना विलंब होत असे. वॉररूमच्या माध्यमातून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी एकत्र आणून त्वरित निर्णय घेण्यास सुरुवात केली. यामुळे मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यासारख्या प्रकल्पांना गती मिळाली, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आगामी पाच वर्षांत महाराष्ट्र सरकार तीन मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार आहे. यात वाढवण बंदर हा प्रकल्प एकंदरीतच राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडविणारा आहे. हे बंदर सध्याच्या जे.एन.पी.टी. पेक्षा तीनपट मोठे असून, २० मीटर खोल असल्यामुळे जगातील सर्वात मोठी जहाजे येथे थांबू शकतील. भारताला जागतिक सागरी व्यापारात महत्त्वाचे स्थान मिळवून देणारा हा बंदर प्रकल्प असेल. त्याचबरोबर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व नव्या स्मार्ट सिटीच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणार आहे. हे विमानतळ पूर्ण झाल्यावर परिसरात एक नवीन व्यापारी आणि तंत्रज्ञान केंद्र विकसित केले जाणार आहे. ही नवी शहरे मुंबईच्या तुलनेत तीनपट मोठी असतील आणि उद्योगांसाठी उत्तम संधी उपलब्ध करतील. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी वैनगंगा–नळगंगा आणि गोदावरी नदीजोड प्रकल्प हाती घेतले जात आहेत. या प्रकल्पांमुळे हजारो शेतकऱ्यांना फायदा होईल आणि शेती उत्पादन वाढणार असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना

राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना संदर्भात श्री.फडणवीस म्हणाले की, जगभरात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. भविष्यात ७०% गुन्हे हे सायबर गुन्हे असतील. या पार्श्र्वभूमीवर नवी मुंबईत भारतातील सर्वात आधुनिक सायबर सुरक्षा केंद्र उभारले आहे. सर्व बँका, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांना या यंत्रणेशी जोडले असल्याने आता कोणत्याही आर्थिक फसवणुकीवर तत्काळ कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २००० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्रात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गुंतवणूक कमी झाल्यामुळे अनेक आयटी कंपन्या बंगळुरू आणि हैदराबादकडे वळल्या. मात्र, अटल सेतूसारख्या प्रकल्पांमुळे नवी मुंबई आता एक नवे तंत्रज्ञान केंद्र बनत आहे. मुंबईच्या भविष्यातील विकास आराखड्यावर भाष्य करताना श्री.फडणवीस यांनी सांगितले की, आजच्या मुंबईत व्यावसायिक जागांची कमतरता असल्यामुळे नवी मुंबई, नवीन ठाणे आणि वाढवण येथे नवीन शहरे उभारली जाणार आहे. त्यामुळे उद्योगांना अधिक जागा उपलब्ध होईल आणि मुंबईवरील भार कमी होईल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## दत्तात्रय गाडेला फासावर लटकावण्यासाठी

त्यांनी एक्स पोस्ट करुन ही माहिती दिली. तसेच महिलांच्या विरोधातल्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी ठोस उपाय करावे, यासाठीही राज्य महिला आयोग पाठपुरावा करणार असल्याचे रुपाली चाकणकर म्हणाल्या. राज्य महिला आयोगाने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी जिल्ह्यातील सर्व एसटी डेपो आणि एसटी बस येथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी बैठक बोलावली आहे. या बैठकीत महिला सुरक्षेसाठी करायच्या उपायांबाबत चर्चा होणार आहे; असे रुपाली चाकणकर यांनी एक्स पोस्ट करुन सांगितले. याआधी स्वारगेट बस डेपोतील शिवशाही बसमध्ये कोंडून तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपीची माहिती देणाऱ्यास पुणे पोलिसांनी एक लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले होते. आरोपी दत्तात्रय गाडे घटनास्थळावरुन फरार झाला होता. पोलिसांनी आरोपीचा फोटो प्रसिद्ध केला होता. शिरुरमधील गुनाट गावात आरोपी लपला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ही माहिती मिळताच पोलिसांनी मध्यरात्री कारवाई केली आणि आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक केली. अटक केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला पुण्यात आणले. लवकरच त्याला न्यायालयात हजर केले जाईल. आरोपीची पोलीस कोठडी मिळवण्यासाठी पुणे पोलीस प्रयत्न करणार आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्ह्यात २४ हजार लाडक्या बहिणी अपात्र

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी : विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर सर्वाधिक परिणाम करणारी गेम चेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधील लाभार्थी महिलांची फेरतपासणी सुरु आहे. याचदरम्यान काही नियमांचं काटेकोरपणे पालन न झाल्याने बुलढाणा जिल्ह्यातील ६ लाख ४७ हजार ४०५ लाडक्या बहिणी पैकी २३ हजार ७७८ लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत त्यामुळे अपात्र ठरलेल्या या लाडक्या बहिणींना योजनेचा आठवा हप्ता मिळणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे, ३.५४ टक्के लाडक्या बहिणी जिल्ह्यात अपात्र ठरले आहेत त्यामुळे आता जिल्ह्यात ६लाख २३ हजार ६२७ पात्र लाडक्या बहिणी आहेत.**

महायुती सरकारला निवडणुकीत महाविजय मिळवून देण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर जाहीर करण्यात आलेली लाडकी बहीण योजना ही गेमचेंजर ठरली. त्यावेळी सर्रास सरसकट सगळ्याच महिलांना या योजनेचा लाभ घेतला. मात्र आता निवडणुका संपल्या. लाडकी बहीण योजना जाहीर करून जेव्हा ती सुरू झाली, तेव्हा त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी विविध निकष निश्र्चित करण्यात आले होते. पण विधानसभा निवडणूक जवळ आल्याने सरसकट सर्व अर्ज स्वीकारण्यात आले. या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळालं आणि महायुतीचं सरकार पुन्हा स्थापन झालं, त्यामुळे पुन्हा सत्तेत आल्यानंतर पैसे द्यायचे कुठून असा प्रश्न निर्माण झाल्याने लाडकी बहीण योजनेसाठी दिलेल्या अर्जांची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ज्या महिलांचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त आहे ज्यांच्या नावावर चार चाकी वाहन आहे ज्या महिला संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना अशा योजनांचा लाभ घेतात त्यांना योजनेतून वगळण्यात आले आहे बहुतांश अशा नियमात न बसणाऱ्या महिलांना लाडक्या बहिणी योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे अपात्र ठरण्याचे सर्वात जास्त प्रमाण लोणार तालुक्यात ६.६० टक्के आहे तर सर्वात कमी प्रमाण जळगाव जामोद तालुक्यात २.४४ टक्के आहे



**तपासणीची सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे ज्या पात्र महिला नाहीत त्या टोमॅटिक कॉम्प्युटर रिजेक्ट होत आहेत ज्यांची वय ६५ वर्षापेक्षा जास्त झाले त्या अपात्र होत आहेत जर चुकून आधार कार्ड च्या नंबर मुळे एखाद्या खात्यात लाडक्या बहिणीचे पैसे मिळाले असतील तर त्यांनी परत करावे असे आवाहन**
**अमोल डिघुळे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी बुलढाणा यांनी केले आहे.**

### तालुका निहाय अपात्र लाडक्या बहिणी

| | | |
|---|---|---|
| बुलढाणा | - | ७००५५ पैकी २०३१ अपात्र |
| चिखली | - | ७०११० पैकी २५०० अपात्र |
| देऊळगाव राजा | - | २९४६८ पैकी १०३९ अपात्र |
| जळगाव जामोद | - | ३९०१५ पैकी ९४७ अपात्र |
| खामगाव | - | ८१६७९ पैकी २६४७ अपात्र |
| लोणार | - | ३६८५३ पैकी २६०३ अपात्र |
| मलकापूर | - | ४२७०९ पैकी १३८४ अपात्र |
| मेहकर | - | ६९ हजार २०६ पैकी २९२४ अपात्र |
| मोताळा | - | ४०३५२ पैकी १६३३ अपात्र |
| नांदूरा | - | ४५८५९ पैकी १६१४ अपात्र |
| संग्रामपूर | - | ३६७६५ पैकी १३ १९ अपात्र |
| शेगाव | - | ३९५६५ पैकी १३७१ अपात्र |
| सिंदखेडराजा | - | ४५७७९ पैकी १७३९ अपात्र |

## संक्षिप्त...

### कल्याण ग्रामीणमधील २७ गावातील अमृत योजनेवरुन ठाकरे-शिंदे गट आमने सामने




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण ग्रामीणमधील २७ गावासह आसपासच्या परिसरात पाणी टंचाई आहे. अनेक वर्षांपासून लोक त्रस्त आहे. पाणी टंचाईमुळे लोक खदाण आणि तलावाचा वापर करता. त्यामुळे अनेकांचा मृत्यू झाला आहे. आठ वर्षांपासून कल्याण ग्रामीणमधील अमृत पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. येत्या मे महिन्यापर्यंत अमृत योजनेचे काम पूर्ण होईल. लोकांना पाणी टंचाई पासून दिलासा मिळाणार असा दावा कल्याण ग्रामीणचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश मोरे यांनी केला आहे. मोरे यांच्या दाव्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांनी राजेश मोरे यांना टोला लगावला आहे. अमृत योजनेच काम अंतिम टप्प्यात आले. मात्र, इलेक्ट्रीफिशनचे टेंडर झालेले नाही. या कामाला अजून सहा महिने लागतील. दिवाळीपर्यंत लोकाना पाणी देणे शक्य होईल. या प्रकरणी नागरीकांची दिशाभूल कोणी करु नये असे म्हात्रे यांनी आमदार मोरे यांना केले आहे.

### पत्नीने केली पतीची हत्या, हत्या प्रकरणातील सर्व आरोपी अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबईतील उलवे मध्ये रहाणारा सचिन मोरे अनेक दिवसांपासून आपल्या पत्नीला मानसिक आणि शारीरिक त्रास देत असल्याने, घटस्फोटाची मागणी मान्य न केल्याने पत्नीने आपल्या १६ वर्षीय मुलगा आणि त्याचा मित्र आणि रिक्षा चालकाच्या मदतीने पतीचा कायमचा काटा काढला. कारल्याच्या ज्यूस मध्ये जास्त प्रमाणात नशेच्या गोळ्या देऊन नंतर उपचारासाठी रुग्णालयात नेण्याच्या बहाण्याने रस्त्यातच ओढणीने गळा आवळून ठार करून उलवे खाडीत मृतदेह फेकून दिला. त्यानंतर पोलीस ठाण्यात पतीच्या मिसिंगची तक्रार दाखल केली. पोलिसांना खाडी किनारी मिळालेल्या मृतदेहाचा फोटो दाखवताच पत्नीने आपलाच पती असल्याचे सांगितले. शेवटी पोलिसांनी विचारलेल्या प्रश्र्नांना समाधानकारक उत्तर न मिळाल्याने संशय बळावला आणि आरोपी पोलिसांच्या जाळ्यात आले. शेवटी आपणच मुलगा आणि मुलाचा मित्र आणि रिक्षावाल्याच्या मदतीने ठार केल्याचे कबूल केले. पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली असून, पुढील कारवाई सुरू आहे.



### प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात ज्वलंत हिंदू छावा संघटनेच्या वतीने निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** ज्वलंत हिंदू छावा संघटनेच्या वतीने गजानन महाराज मंदिर परिसरात आज आंदोलन करण्यात आले. प्रशांत कोरटकर यांनी महाराष्ट्राच्या अस्मितेवर व भारत देशाच्या अस्मितेवर घाला घातला छत्रपती शिवराय यांच्या बद्दल अवमान कारक वक्तव्य करून महाराजांच्या वीरतेवर ,शौर्यतेवर, शिवनीती, गनिमी कावा या सगळ्या विचारावर त्यांनी घाला घातला असून प्रशांत कोरटकर यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी गजानन महाराज मंदिर येथे ज्वलंत हिंदू छावा संघटनेच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरती महाराष्ट्रात नव्हे देशात नव्हे तर जगभरात अभ्यास करून लोक त्या शिवनीतीचा गनिमी काव्याचा वापर करतात आणि महाराजांच्या वीरतेवर शौर्यतेवर प्रश्र्न उपस्थित करणाऱ्या कोरटकर अशा मानसिकतेच्या लोकांना वेळीच शिक्षा दिली पाहिजे कोणत्याही महापुरुषांच्या विरुद्ध जर कोणी अवमान कारक भाष्य करत असेल तर त्यांना शिक्षा करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला पाहिजे असे यावेळी आंदोलन कर्ते म्हणाले

## धक्कादायक! वाशिम जिल्ह्यात गेल्या २४ तासात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यात गेल्या २४ तासात लैंगिक अत्याचाराच्या दोन वेगवेगळ्या घटनेने जिल्हात एकच खळबळ उडाली आहे. महाविद्यालयीन तरुणीवर अज्ञात व्यक्तीकडून बलात्कार करण्यात आले आहे. वाशिम शहरात एका सहा वर्षीय बालिकेवर बलात्काराची एक घटना घडल्यानंतर २४ तासाच्या आत दुसरी घटना घडल्याचे समोर आले आहे. यातील पहिल्या घटनेत आईस्क्रिम आणण्यासाठी दुकानात गेलेल्या एका ७ वर्षीय चिमुकलीवर १९ वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडलीय. वाशिम शहरात २६ फेब्रुवारीच्या संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडलीय. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला पोलिसांनी अटक करत बेड्या ठोकल्या आहे.



शेतशिवारात नेत चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

दरम्यान, ही घटना ताजी असताना, वाशिमच्या रिसोड शहरातील वाशिम मार्गावर एका १७ वर्षीय अल्पवयीन महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर बलात्कार झाल्याची घटना काल(२७ फेब्रुवारी) दुपारच्या दरम्यान घडली. दरम्यान ही अल्पवयीन मुलगी शिक्षणासाठी आपल्या मामा कडे राहत होती. अशातच दुपारी जेंव्हा कॉम्प्युटर क्लास संपून ती बाहेर आली असता त्या वेळेस आरोपीने त्या मुलीवर पाळत ठेऊन तिला एकटे पाहून बोलावून घेतलं. तुझ्या मामाने मला तुला नेण्यासाठी पाठवलं, मी तुझ्या मामाच्या ओळखीचा आहे. असं सांगत आरोपीने तिला ऑटो रिक्षामध्ये बसवून वाशिम मार्गावरील सवड गावा जवळील शेतशिवारात नेलं. यावेळी आरोपीने चाकूचा धाक दाखवून बलात्कार केला आणि घटनास्थळी एकटीला सोडून तो तिथून निघून गेला. जेंव्हा पीडित मुलगी घरी गेली आणि तीने घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितला असता तेंव्हा कुटुंबियांनी तत्काळ पोलीस स्टेशन गाठले आणि तपास सुरू केला. पोलिसांनी याप्रकरणी रिसोड पोलिसात अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस घटनेचा अधिक तपास करत आहे. मात्र वाशिम जिल्ह्यात गेल्या २४ तासात लैंगिक अत्याचाराच्या दोन वेगवेगळ्या घटनेने जिल्हात एकच खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांना हे शोभनीय नाही- विजय वडेट्टीवार

राष्ट्रपतीची स्वाक्षरी शक्ती कायद्यावर का झाली नाही? शक्ती कायदाची अंमलबजावणी होऊ नये, यावर सरकारची काय भूमिका आहे? शक्ती कायदा महाराष्ट्रात लागू करायचा नाही का ? हे सरकारने स्पष्ट करावे. शक्ती कायदा कॅबिनेट पुढे हा विषय येईल, तो विधेयक मागे घेतला जाईल. सरकार नव्याने ते विधायक आणणार आहे का? राष्ट्रपतीची स्वाक्षरी का झाली नाही, सरकारने ते का करून घेतले नाही. असे अनेक सवाल करत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवर भाष्य केलंय.

शक्ती कायदा लागू करण्यासाठी काय अडचण आहे? हा कायदा लागू झाला तर आमच्याच लोकांच्या अडचणी होईल, असं सरकारला वाटत आहे का? महिलांवर अत्याचार वाढत गेले, इज्जत लुटली गेली तरी देणे घेणे नाही, अशी भूमिका सरकारची आहे का? शक्ती कायदा विधेयक मागे घेऊ नका, काय दुरुस्ती करायचे ते करावे. पण या अधिवेशनात हे विधयक आणून राष्ट्रपतीच्या साहिसाठी पाठवावे. राज्य बिहार, यूपी यापुढे आहे, असं म्हणत होतो. मात्र आता महाराष्ट्र महिलांच्या अत्याचार याबाबतीत पुढे आहे. महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांना हे शोभनीय नाही, अशी टीका ही काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केलीय.

### मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालय उडवून देण्याची धमकी; पाकिस्तानी नंबरवरून मेसेज येताच खळबळ

**मुंबई /प्रतिनिधी :** अनेक दिवसांपासून धमक्यांचे सत्र सुरु असल्याचं बघायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या गाडीला उडवून देण्याची धमकी आली होती. हे प्रकरण ताजे असतानाच आता मंत्रालयामधील मुख्यमंत्री कार्यालयावर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. ही धमकी पाकिस्तानी नंबरवरून देण्यात आली असल्याची माहिती समोर आलीय. मुंबई वाहतूक पोलिसांना हा धमकीचा मेसेज पाठवण्यात आला आहे. मुंबई पोलिसांनी या धमकी प्रकरणी गुन्हा दाखल करून लगेच तपास सुरू केला आहे.

## ज्या ठिकाणी विद्यार्थी कॉपी करताना दिसले त्यां शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत-माध्यमिक शिक्षण अधिकारी अश्विनी लाटकर



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** ओहर गावात तहसीलदार मुनलोड यांनी भेट दिली त्या ठिकाणच्या परीक्षा केंद्राचा अहवाल तयार करण्यात येणार असून त्यानुसार संबंधित केंद्रावर कारवाई करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजी नगर शिक्षण विभागाच्या वतीने गेल्या दोन महिन्यापासून कॉपी मुक्त अभियानाची जनजागृती करण्यात आली होती. परीक्षा सुरू झाल्या तेव्हा बारावीच्या परीक्षेमध्ये काही ठिकाणी कॉपी घडल्याच्या घटना घडल्या. भरारी पथकाच्या देखील निदर्शनास हि बाब निदर्शनास आली आहे यानुसार विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली आहे याचा अहवाल पाठवण्यात आला आहे. आदर्श कॉलेज व राजर्षी शाहू महाराज कॉलेज या ठिकाणी भरारी पथकाला खूप मोठ्या प्रमाणात कॉपी आढळून आल्यात त्या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पिंपळगाव वळण फुलंब्री येथील केंद्रावर कॉफी आढळून आल्याने कलम सात आणि आठ नुसार पर्यवेक्षक व केंद्र संचालक यांच्यासह इतर शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित परीक्षा केंद्रावर असलेले पर्यवेक्षक हे अधिकृत मान्यता प्राप्त शिक्षक नाही तेव्हा त्यांच्यावर बारा व्यक्ती व एक केंद्र संचालकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

निमगाव तालुका वैजापूर कल्पतरू महाविद्यालय निमगाव येथे मोठ्या प्रमाणात कॉफी आढळून आले आहेत. या परीक्षा केंद्रावर देखील कारवाई करण्यात आली आहे.

आदर्श विद्यालय पिंपळगाव वळण यांचं परीक्षा केंद्र कायमस्वरूपी रद्द करणे व महाविद्यालयाचे खाते मान्यता रद्द करण्याची शिफारस आम्ही केली आहे कल्पतरू महाविद्यालयाची कायमस्वरूपी मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी विद्यार्थी कॉपी करताना दिसले त्यां शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत

## आगामी सण उत्सव डी जे विरहित करण्यासाठी बिटरगाव ठाणेदार यांनी उचलला विडा

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**ढाणकी :** आज च्या धकाधुकी च्या जीवनात भारतीय नागरिकाला आरोग्य जोपासण्यासाठी वेळ नाही, तो आपल्या भारताची संस्कृती विसरत पाश्र्चात्य देशाच्या संस्कृतीचे अनुकरण करत आहे. त्यामुळे ते आपले जीवन अधीकच घातक करत आहेत. आज मनोरंजन च्या नावाखाली गाव दणाणून सोडणार्या 'डीजे'च्या कर्णकर्कश्श आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्तींच्या जीवाची घालमेल होत आहे. पाश्चात्य संस्कृती असलेल्या 'डीजे' मुळे पारंपरिक लोककला लुप्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे सनई-चौघडा, नगारा, तुतारी, लेजीम, ढोल, ताशा, झांज आदी पारंपरिक वाद्य लुप्त होऊ लागली आहेत.या पार्शवभूमी वर बिटरगाव ठाणेदार यांनी आगामी सण उत्सव निमित्त ढाणकी पोलीस चौकी येथे शांतता मिटींग आयोजित करत गावातील जेष्ठ नागरिक, शांतता कमेटी सदस्य , समाजसेवक, तरुण वर्ग आणि गावातील पत्रकार यांना आमंत्रीत करत ते शांतता मिटींग मध्ये लोकांना संबोधित करताना म्हणत होते की,भारतीय संस्कृतीमध्ये राहणीमान हे विविधतेने भरलेले, परंपरा जपणारे, शांततेने एकत्र राहणारे, आणि धार्मिक सहिष्णुतेचे आहे. आपण ज्या भारतात राहतो त्यात अनेक धार्मिक लोक त्यांच्या स्वतःच्या भिन्न संस्कृतीसह शांततेने एकत्र राहतात. प्रत्येक धर्मात सांगितले आहे की आपल्यामुळे दुसऱ्यांना त्रास होऊ नये मंग आपण आपल्या धर्मा प्रमाणे वागतो का?. असे ते म्हणत असताना आपण मोठया आवाजाचे डी. जे लावून ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्तींना त्रास देत आहोत की नाही,असा प्रश्र्न उपस्थित करून त्यांनी आव्हान केले की, आपण आपले सगळे येणारे आगामी सण उत्सव आपल्या पारंपरिक पद्धतीने साजरा करून विविधतेने भरलेले, परंपरा जपणाऱ्या देशात शांततेने एकत्र रहाण्यासाठी पश्र्चात्य संस्कृती असलेल्या 'डीजे'ला हाकलून लावू.

आपली पारंपरिक संस्कृती जोपासण्यासाठी आपल्याला पाश्चात्य संस्कृती सोडून द्यावी लागेल. त्या साठी मी ठाणेदार भगत साहेब यांच्या संकल्पनेचे स्वागत करून येणाऱ्या राम नवमी जयंती ला डी. जे. सारख्या घातक हत्याराला फेकून भारतीय पारंपरिक संस्कृतीनुसार राम नवमी शोभा यात्रा काढण्याचे वचन देतो.
**-रोहित वर्मा**
**महामंत्री भाजयुमो, पुसद जिल्हा**



विविध वृत्त...

## अनोळखी मृतदेह आढळला: ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देऊळघाट टोलनाका येथे अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या मृत इसमास ओळखणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी नामे डॉ शेख युनुस तर्फे कक्ष सेवक विनोद सतीष ढोरमारे (वय २९ वर्ष) रा. बुलडाणा यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन बुलडाणा (ग्रा) येथे मर्ग दाखल केले आहे. त्यामध्ये एक अनोळखी मृतकाच्या अंगामध्ये राखाडी रंगाचे आडव्या लाइनचे कॉलरचे टि शर्ट, राखाड्या रंगाचे हाफ पँट, विटकरी रंगाचे निकर असून मृतकाची दाढी, मिशी तसेच डोक्यावरील केस वाढलेले, डाव्या पायावर गुडघ्याचे खाली जुन्या जखमाचा पांढरा छोटा व्रण, उंची अंदाजे ५.५ फुट उंची असलेला अनोळखी इसमाचा मृतदेह मिळुन आलेला आहे. या वर्णनाचा इसम पोलीस स्टेशन हद्दीतून हरवीला किंवा कोणी या इसमास ओळखत असल्यास पोलीस स्टेशन, बुलढाणा (ग्रा) येथे संपर्क साधावा.

तसेच बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ०७२६२-२४१२५५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा पोलीस उपनिरीक्षक गोकुळसिंग राठोड यांना ९७६५४८६६१४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा - धीरज लिंगाडे



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पुण्यातील घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी तर म्हणेल निंदनीय आहे. आपले गृह गृहराज्यमंत्री आहेत त्यांनी जे काही स्टेटमेंट यासंदर्भात दिलेलं आहे त्या स्टेटमेंटचा मी निषेध करतो. त्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांनी केली आहे. तर ते बोलताना पुढे म्हणाले की, बस मध्ये जी घटना घडते आणि ती घटना घडल्यानंतर गृहमंत्री जर म्हणत असतील त्या ठिकाणी कोणताही आवाज आला नाही, अशा पद्धतीचं स्टेटमेंट करणं निंदनीय आहे. त्यामुळे त्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणी करतो.

अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांच्या स्थानिक विकास निधीतून १ कोटी १० लक्ष रुपयाचे शैक्षणिक साहित्याचे वाटप आज बुलढाणा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयावर आमदार धीरज लिंगाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी लिंगाडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी जिल्ह्यातील १२० प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक,कनिष्ठ महाविद्यालय शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तर यावेळी कम्प्युटर आरो प्रिंटर यासह शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

## प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात मराठा समाज आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :**इतिहासकार इंद्रजित सावंत यांना शिवीगाळ आणि कोल्हापुरात आल्यास त्यांना जीवे मारण्याची धमकी प्रशांत कोरटकर यांनी दिली. या घटनेवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. पूर्ण महाराष्ट्रात शिवप्रेमीसह मराठा समाज चांगलाच आक्रमक झाल्याचा बघायला मिळत आहे आज धुळ्यात देखील सकल मराठा समाजाच्या वतीने इंद्रजीत सावंत यांना शिवीगाळ करणाऱ्या प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात कठोर कारवाई करून धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

इतिहासकार इंद्रजित सावंत यांना फोनवरून शिवीगाळ केल्याचा आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. सावंत यांनी सोशल मीडियावर कोरटकर यांची एक कथित ऑडिओ क्लिप प्रसिद्ध केली आहे, ज्यामध्ये ते छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करताना ऐकू येतात त्यामुळे सकल मराठा समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी अशी मागणी देखील यावेळी धुळे शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.

# बुलढाणा जिल्हयातील राष्ट्रीयकृत बँकाच्या मंजूर झालेल्या नविन शाखा ३१ मार्चपर्यंत सुरु करा

## केंद्रीयमंत्री ना.प्रतापराव जाधव यांचे बँकर्स बैठकीत निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये १३ ठिकाणच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये नॅशनल बँकांच्या नविन शाखांना केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मान्यता दिल्याने मान्यताप्राप्त शाखा ३१ मार्च पर्यंत सुरु करण्याचे निर्देश केंद्रीयमंत्री आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी या संदर्भात बँकींग अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले. त्यानुसार बँका आता ग्रामीण भागामध्ये सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

दिनांक २८/०२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, एल.डी.एम.श्री.के.के.सिंग, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री.प्रमोद लांडे, एस.बी.आय.बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, आय.सी.आय.सी.आय बँक,बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, इंडीयन ओव्हरसिज बँक, इंडीयन बँक, युनियन बँक, युको बँक तथा इतर राष्ट्रीय वित्तीय संस्थांचे विभागिय व्यवस्थापक उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांना राष्ट्रीयकृत बँकेची सेवा मिळावी या दृष्टिकोनातून राष्ट्रीय बँकेच्या अधिकाऱ्यां सोबत केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची यापुर्वी या बैठक संपन्न झाली होती. या बैठकीत ज्या ग्रामिण ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा नाहीत अशा ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा सुरु कराव्यात असे निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने केंद्रीय अर्थमंत्रालयाकडे मांगणी सुध्दा करण्यात आली होती. त्यानुसार आता बुलढाणा जिल्ह्यातील मलकापुर येथे कॅनरा बँक, चिखली येथे बँक ऑफ बडोदा शेगांव येथे बँक ऑफ बडोदा जळगांव जामोद येथे बँक ऑफ इंडीया तर ग्रामिण भागातील मेहकर तालुक्यातील अंजनी बु. येथे बँक ऑफ बडोदा, खामगाव



तालुक्यातील अंत्रज, गोधनापुर,कंझारा येथे अनुक्रमे कॅनरा बँक, इंडीयन ओव्हरसिज बँक, युनियन बँक ऑफ इंडीया तर लोणार तालुक्यातील वणी येथे सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, चिखली तालुक्यातील इसोली येथे युको बँक, शेगाव तालुक्यातील लांजुंड येथे इंडिया बँक आणि संग्रामपूर तालुक्यातील कवठळ येथे पंजाब नॅशनल बँक, शाखा सुरू होणार आहे. या संदर्भातील राज्यस्तरीय बँकर्स समिती ने परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामुळे लवकरच या शाखा या ग्रामीण भागामध्ये लोकांच्या सेवेत सुरू होणार आहे.

### ना.प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामण यांचे मानले आभार.. !

बुलढाणा जिल्हयातील ग्रामिण व शहरी भागात नविन राष्ट्रीयकृत शाखांना केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मान्यता दिल्याने ना.प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामण यांचे आभार मानले आहे.

### जिल्हा बँकेच्या बंद झालेल्या शाखेच्या ठिकाणी तसेच मोठया गावात राष्ट्रीयकृत बँका सुरु करण्यासाठी करा नव्याने सर्वे करा! ना.प्रतापराव जाधव यांचे निर्देश

पुर्वी जिल्हा केंद्रीय बँकेच्या जिल्हाभरात शाखा असल्याने शेतकऱ्यांना जिल्हा बँकेच्या वतीने विनासायास पिक कर्ज मिळत होते परंतु जिल्हा बँकेच्या शाखा बँक अवसायानात गेल्याने बंद पडल्या त्यामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना पिककर्जासाठी खाजगी सावकारांकडुन अव्वाच्या सव्वा व्याजाने कर्ज घ्यावे लागते. जिल्हयामध्ये राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखांची अजुनही गरज असल्याने जिल्हा बँकाच्या बंद पडलेल्या शाखांच्या ठिकाणी तसेच जास्त लोकसंख्यांच्या गावांमध्ये सर्वे करुन राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा सुरु करण्याबाबत ना.प्रतापराव जाधव यांनी सदरहु बैठकीत निर्देश दिले आहे. त्या अनुषंगाने आता नव्याने सर्वे होवुन इतर बँकांच्या शाखा सुद्धा जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागामध्ये सुरू होण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे..



## ० ते १८ वयोगटातील मुलामुलींची आरोग्य तपासणी होणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार संपूर्ण राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम मोहिमेच्या स्वरूपात राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे राज्यस्तरीय उद्घाटन शनिवार, १ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता पुणे येथे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या हस्ते व आरोग्य मंत्री ना.डॉ. प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. या मोहिमंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालके व किशोरवयीन मुलामुलींची आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हास्तरीय कार्यक्रम पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सहकार विद्यालय, चिखली रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालके तसेच किशोरवयीन मुलामुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बालविकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग आणि नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलामुलींची प्राथमिक आरोग्य तपासणी केली जाणार. आजारी आढळलेल्या बालकांवर तात्काळ उपचार केले जातील. गरजू व आजारी बालकांना औषधोपचार व शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा व समुपदेशनाच्या सुविधा पुरविण्यात येतील.

या तपासणीसाठी नियुक्त पथकामध्ये पुरुष व महिला अधिकारी, औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य सेविका यांचा समावेश आहे. उच्चस्तरीय उपचार व शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या बालकांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महापालिका रुग्णालये, महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत करारबद्ध रुग्णालये व आरबीएसके करारबद्ध रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## केंद्र सरकार चौकशीपासून पळ काढत आहे

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांची सत्ताधाऱ्यांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीत फ्री अँड फोर इलेक्शनवर प्रश्न उभे राहिले आहेत. मतदान यादी बनवताना घोळ सिद्ध झाले आहे. सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली असता केंद्र सरकार चौकशी पासून पळ काढत आहे. अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सत्ताधाऱ्यांना केले.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ माध्यमांशी बोलताना म्हणाले की, राहुल गांधी यांनी लोकसभेत या सगळ्या प्रकारांची चौकशीची मागणी केली. राहुल गांधी यांनी आरोप केले नाही, तर याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली. नैतिकतेच्या आधारावर ताबडतोब चौकशी करणे अपेक्षित होते. मात्र, ते दुर्लक्ष केले गेले. मतदान झाल्यापासून काल परवा पर्यंत निवडणूक आयोगाला भेटले माहिति मागितली काही, आक्षेप नोंदवले. मात्र, त्यांनी माहिति देऊ शकत नाही असे म्हणाले.म्हणून निवडणूक आयोगावर आवाज उठवित आहोत. केंद्र सरकार चौकशीपासून पळ काढत आहे. आम्ही लोकांपर्यंत जाऊन मतदार यादीत कसा घोळ झाला याची माहिती लोकांपर्यंत देऊ. अश्रयाप्रकारची माहिती देणारे एक अभियान घेण्याचा निर्णय या बैठकीत झाला या संदर्भात चर्चा झाली.

आगामी काळात आमची मागणी हीच असणार फ्री अँड फेर इलेक्शन झाले पाहिजे. या निवडणुकीत फिक्सिंग केली आहे. हे फिक्सिंग सरकार आहे. हे सरकार जिथे संधी मिळेल तिथे पैसे कमवत आहे. जुन्या गाड्यांना नवीन नंबर प्लेट लावून त्यावर कर वाढवला आहे. हा निर्णय सरकारने ताबडतोब मागे घ्यावा, अशी मागणी पत्र लिहून केली आहे. योगेश कदम यांनी केलेल्या त्या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो. त्या आरोपीची बाजू घेत आहेत. का? घाशीराम कोतवाल सारखे गृहविभागातला मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. नामदेव ढसाळ कोण आहेत. असा प्रश्न विचारणारा कोण आहे. हाच आता मोठा प्रश्न आहे.असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

### महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांचा दौरा

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे १ ते ३ मार्च या कालावधीत नांदेड दौऱ्यावर येत आहेत. १ मार्च रोजी त्यांचे आगमन होणार असून दुपारी १२ वा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या अंतर्गत असणाऱ्या आश्रमशाळांना ते भेटी देणार आहेत. २ मार्चला सकाळी ११ वा. सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्या अधिनस्त असणाऱ्या वसतीगृहांना ते भेटी देणार आहेत. ३ मार्चला संघटनेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील तर सायं ६ वा. संविधानाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमासाठी कुसूम सभागृह येथे ते उपस्थित राहतील. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह येथे असेल.

# ढाणकी येथे नाफेडचे खरेदी केंद्र सुरू करा; भारतीय किसान संघाची मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** ढाणकी हे गाव तालुक्यात मोठी बाजार पेठ असून येथील मुख्य व्यवसाय शेती असून भुसार, किराणा, दवाखाने, मेडिकल, कापड दुकान आणि पेट्रोल पंप या सारखे व्यवसाय सुद्धा जोमात चालते या व्यवसायामुळे ढाणकी गावाला लागून असलेले ४०ते ५० खेड्यातील जनतेसाठी ढाणकी हे तालुका असल्यासारखी आहे . तसेच ढाणकी व आजूबाजूच्या परिसरातील खेडेपाड्यातील लोकांचे मुख्य व्यवसाय शेती आहे. ढाणकी हे खरेदी विक्री संघाची उपशाखा असून सुद्धा शहरात नाफेड केंद्र नसल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. ३० ते ४० किमी उमरखेड तालुक्याच्या ठिकाणी माल शेतकऱ्यांना घेऊन जावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपले महत्वाचे काम सोडून नंबर लागत नसल्याने बरेच दिवस नंबर लागण्याची वाट बगावी लागते. यामुळे त्यांच्यावर भाड्याने आणलेल्या वाहतूकीच्या गाडी भाडयाचे पैसे वाढत असल्याने आपल्या मालावरील नफा वाहतूक भाड्यात जात आहे.त्यामुळे शेतकरी एवढी मेहेनत करून सुद्धा एक रुपया कमावत नसल्याने नैराश्यमधी आला आहे. जर लवकरात लवकर शेतकऱ्यांची अडचण पाहून खरेदी विक्री संघ उमरखेड यांनी हंगामापासून नाफेड केंद्र चालू करून शेतकरी वर्गाला त्यांचा नफा मिळवण्यासाठी ढाणकी येथे नाफेडचे खरेदी केंद्र सुरू करा म्हणून भारतीय किसान संघाने मागणी केली आहे . जर ही मागणी मान्य न झाल्यास भारतीय किसान संघाच्या वतीने संविधानिक मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे खरेदी विक्री संघ उमरखेड यास भारतीय किसान संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी भारतीय किसान संघाचे पुसद



जिल्हा कोषाध्यक्ष नितीन येरावार, गोपालसिंह गौर भारतीय किसान संघ ढाणकी तालुका अध्यक्ष, दिगांबर शिरडकर भारतीय किसान संघ महामंत्री ढाणकी, बक्काजी रावते भारतीय किसान संघ उपाध्यक्ष, बाळू शहापुरे उपस्थित होते.